C M Y K

www.majhisarkar.com

सायं. दैनिक माझी सरकार

• संपादक : शेख फारुक हमीद • मो.9423309302

बीड ▪ शुक्रवार दि. १६ मे, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2023/88578 ▪ majhisarkar2023@gmail.com ▪ वर्ष २ ▪ अंक २७१ ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रु.

Beed ▪ Friday 16 May, 2025 ▪ RNI : MAHMAR/2023/88578 ▪ majhisarkar2023@gmail.com ▪ Year-2 ▪ Issue-271 ▪ Pages 4 ▪ Price 3

## राजवर्धन पंडितचे एसएससी परीक्षेत उज्वल यश



सरकार नेटवर्क

गेवराई : छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलचा विद्यार्थी राजवर्धन रोहित पंडित यांनी मार्च २०२५ मध्ये झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण प्राप्त करून उज्वल यश संपादन केले आहे या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. छत्रपती संभाजी नगर येथील नाथ व्हॅली स्कूलमध्ये शिक्षण घेणारा राजवर्धन पंडित हा विविध क्षेत्रांमध्ये अग्रेसर असून अनेक स्पर्धेमध्येही त्याने नावलौकिक मिळवलेला आहे. नुकत्याच झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण » पान २ वर

# बीड, नांदेड, औरंगाबादमध्ये 'सीट्रीपल आयटी'ना मंजुरी

## मराठवाड्यात २१ हजार युवकांना मोफत कौशल्य प्रशिक्षण

## अजित पवार यांनी केलेली घोषणा दीड महिन्यातच पूर्ण

सरकार नेटवर्क

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांच्याच पुढाकारामुळे बीड जिल्ह्यानंतर आता नांदेड आणि औरंगाबाद या दोन जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक 'सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इक्युबेशन अॅन्ड ट्रेनींग' अर्थात 'सीट्रीपल आयटी' मंजूर करण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पाठविलेल्या पत्राला कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून नांदेड आणि औरंगाबादसाठी दोन प्रशिक्षण केंद्रे मंजूर केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. अजित पवार यांनी घोषणा केल्यानंतर अवघ्या दीड महिन्यात मराठवाड्यातील बीड, नांदेड, औरंगाबाद या तीन जिल्ह्यांसाठी तीन 'सीट्रीपल आयटी' मंजूर झाले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रयत्न आणि टाटा टेक्नॉलॉजीच्या सहकार्याने महिन्यापूर्वी बीडसाठी 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाले आहे. त्यानंतर आता नांदेड व औरंगाबाद साठी दोन 'सीट्रीपलआयटी' मंजूर झाल्याने, मराठवाड्यातील युवकांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण, उद्योगक्षेत्राला कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. मराठवाड्यात नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासह अनेक उद्दीष्टांची यानिमित्ताने पूर्ती होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्याचा विकासावर लक्ष केंद्रीत केले असून त्यांचे सातत्याने मराठवाडा दौरे सुरु आहेत. दि. २३ मार्च २०२५ रोजीच्या मराठवाडा दौऱ्यात नांदेड येथे बोलताना त्यांनी बीड, नांदेड व औरंगाबाद येथे 'सीट्रीपल आयटी' उभारण्याची घोषणा केली होती. दौऱ्यावरुन मुंबईत परतल्यानंतर दि. २५ मार्च २०२५ रोजी तात्काळ टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून या तीन जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपल आयटी' उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. कंपनीने दीड महिन्यात तिन्ही जिल्ह्यांसाठी 'सीट्रीपल आयटी' मंजूर केल्याची पत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठवून सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या » पान २ वर

### मराठवाड्यातील हजारो युवकांना प्रशिक्षण

'सीट्रीपल आयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षण खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून करणार आहेत. यामुळे नांदेड, औरंगाबाद, बीड जिल्ह्यांसह मराठवाड्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या धडाकेबाज, निर्णयक्षम कार्यपद्धतीबद्दल मराठवाड्यातील नागरिकांकडून आनंद, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



## पाच लाखांच्या खंडणीसाठी बीडमध्ये व्यापाऱ्याचे अपहरण करून बेदम मारहाण

सरकार नेटवर्क



बीड : वाहनांची खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याचे चौघांनी पाच लाख रुपयांच्या खंडणीसाठी संगनमत करून अपहरण केले, तसेच बेदम मारहाण केल्याची घटना गिरामनगर भागात घडली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला. पंजाब पांडुरंग शिंदे (वय ३३, रा. गिरामनगर, पांगरी रोड, बीड) यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार दिनेश पोपट ठोसर, विठ्ठल गायकवाड (दोघेही रा. उखंडा, लिंबादेवी, ता. बीड), बालाजी बहिरवाळ (रा. धानोरा रोड, बीड), मयूर खोमणे (चऱ्हाटा फाटा, बीड) अशी गुन्हा नोंद झालेल्या आरोपींची नावे आहेत. रात्री सव्वानऊला घरी असताना दिनेश पोपट ठोसर, विठ्ठल गायकवाड बालाजी बहिरवाळ व मयूर खोमने या चौघांनी घराबाहेर बोलावून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर जबरदस्तीने त्यांच्या काळ्या रंगाच्या स्विफ्ट कारमध्ये बसवून त्यांना नगर रोडवरील देवराज बारमध्ये नेण्यात आले. तेथे आरोपींनी पाच लाख रुपयांची मागणी करत पुन्हा एकदा मारहाण केली. यावेळी बालाजी बहिरवाळ याने बीअरच्या बाटलीने शिंदे यांच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले. अपघातानंतर शिंदे यांनी जीव वाचवण्यासाठी अंधाराचा फायदा घेत बारमधून पळ काढला व जवळील स्टोन क्रशरवर लपून बसले. काही वेळाने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले व शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आणले. याप्रकरणी आरोपी दिनेश ठोसर, विठ्ठल गायकवाड, बालाजी बहिरवाळ व मयुर खोमणे यांच्या विरोधात अपहरण, मारहाण, जबरदस्ती, खंडणी मागणी व इतर कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास शिवाजीनगर पोलिस करत आहेत.

## समुपदेशनाने बदल्यांचा निर्णय भविष्यातही कायम राहील : पंकजा मुंडे

सरकार नेटवर्क

पुणे : पुन्हा एकदा इतिहास घडविताना या ऐतिहासिक क्षणाची मी साक्षीदार होतेयं याचा मला अतिशय आनंद होत आहे. अधिकाऱ्यांचे मनोबल वाढवून भ्रष्टाचारमुक्त धोरण राबविणे यासाठी पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याचा निर्णय मी घेतला. हा निर्णय भविष्यातही कायम राहील. गाव पातळीवर कष्ट करणाऱ्या सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद माझ्यासाठी महत्वाचा आहे. तुमच्या बदल्या मनासारख्या केल्या आहेत, आता चांगले आणि फ्रेश मनाने काम करा, अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांशी संवाद साधला. राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा आणि बदल्यांची प्रक्रिया



पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नुकताच घेतला होता. या बदल्यांची प्रक्रिया आजपासून आयुक्त पशुसंवर्धन यांच्या कार्यालयात श्रीमती. पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत सुरू झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामा०स्वामी, आयुक्त प्रवीण कुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे यावेळी उपस्थित होते. श्रीमती मुंडे म्हणाल्या की, ग्रामविकास मंत्री असताना शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांचा निर्णय मी घेतला होता, त्यावेळी त्याचा फायदा अनेक शिक्षकांना जे तिथपर्यंत पोहोचू शकत नव्हते त्यांना झाला. आऊट ऑफ बॉक्स जाऊन निर्णय घेण्याची आवड असल्याने आताही पशुसंवर्धन विभागासाठी मी हा निर्णय घेतला. एकदा घेतलेला निर्णय बदलत नाही, त्यामुळे भविष्यातही हा निर्णय कायम राहणार आहे. माझे वडील लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणायचे, ज्याची पत नाही, ऐपत नाही त्यांचा आवाज बनण्यासाठी मी राजकारणात आहे, अगदी तोच वारसा » पान २ वर

## शासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी गावच विक्रीसाठी काढला

सरकार नेटवर्क

आष्टी : आष्टी तालुक्यातील वनवेवाडी गाव ग्रामस्थांनी गाव विक्रीसाठी काढण्याचा निर्णय घेतला असून, हा निर्णय गावातील मूलभूत सुविधांची दीर्घकाळापासून होत असलेली उपेक्षा पाहता घेतल्याचे ग्रामस्थांनी सांगितले आहे. गावकऱ्यांनी आपल्या संतापाला वाट मोकळी करून देताना एक अनोखे बोंबल्या आंदोलन उभारले. या आंदोलनात त्यांनी गावातील रस्त्यांवर असलेल्या खड्यांचे प्रतीकात्मक वर्षश्राद्ध घालून प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध केला. गेल्या अनेक वर्षांपासून रस्ते,



पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षण अशा मूलभूत गरजांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. शेवटी, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी गावच विक्रीसाठी काढण्याचा टोकाचा निर्णय घेतला. ग्रामस्थांची मागणी आहे की, शासनाने त्वरित पावले उचलून गावात आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि त्यांचे जीवनमान सुधारावे.

## भाजपा मंत्री विजय शहावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा : गणेश बजगुडे पाटील

सरकार नेटवर्क

बीड : ज्या पाकिस्तानी अतिरेक्यांनी काश्मिरच्या पहेलगाम भागात निष्पाप भारतीयांवर हल्ला केला त्यात अनेक निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमावावा लागला. त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंधूर राबवत कर्नल सोफिया कुरैशी व पायलट व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यादी तळावर हवाई



हल्ले करून दहशतवाद्यांचे समुळ नष्ट केले. अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम, शौर्याचे संपुर्ण भारतवासी कौतुक करत असताना मध्ये प्रदेश सरकार मधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारायला त्यांचीच बहिण पाठवली म्हणत अतिशय बेताल व संतापजनक वक्तव्य करून भारतीय सैनिकांचा अवमान केलेला आहे.

कर्नल सोफिया कुरेशी या भारतीय असुन तमाम भारतीयांच्या त्या बहीण आहेत. परंतु त्या मुस्लिम आहेत म्हणुन त्यांना आतंकवादयाची बहीण म्हणणे हे अतिशय निंदनीय व खेदजनक आहे. या वक्तव्याचा बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत अश्याप्रकरे बेताल वक्तव्य करणाऱ्या भाजपा मंत्री विजय शहावर देश द्रोहाचा गुन्हा दाखल करुन मंत्री मंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी काँग्रेसचे नेते तथा शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष गणेश दादा बजगुडे यांनी केले आहे.

## किल्लेधारूर शहरातील कसबा विभागातील रस्त्यांची दयनीय अवस्था

सरकार नेटवर्क

किल्लेधारूर : किल्लेधारुर शहरात कसबा विभागात पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. हे काम करताना गुत्तेदाराच्या चुकीमुळे नागरिकांना वागणेही अवघड झाले आहे. पाईपलाईन खोदताना निघालेले दगड, माती पाईपलाईन बुजताना खड्यात टाकणे अपेक्षित आहे पण ती थातुरमातूर पध्दितेने बुजली आहे. उरलेली माती रस्त्यावर पसरली गेली असून अवकाळी पावसानेच रस्ते चिखलमय व खड्डेमय झाले आहेत. वाहन तर दुरच पण पायी चालणेही अशक्य झाले आहे. अवकाळी पावसातच ही अवस्था असून



पावसाळ्यात यापेक्षाही वाईट अवस्था होणार आहे. नवीन रस्ते होण्यासाठी बराच कालावधी लागणार असून या रस्त्यावर नगर परिषदेने निदान मुरूम तरी टाकून होणारे हाल थांबवावेत अशी कळकळीची मागणी कसबा विभागातील नागरीक करत आहेत.

## जाफर इनामदार यांच्या अनेक दिवसांच्या पाठपुराव्यामुळे अखेर लेंडी नाला साफ

सरकार नेटवर्क

बीड : शहरातील नागरिकांची दीर्घकाळची तक्रार आणि जाफर इनामदार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर प्रशासनाने लक्ष घालून लेंडी नाल्याची साफसफाई केली आहे. मोमीन पुरा प्रभाग क्रमांक २१ येथील लेंडी नाला अनेक दिवसांपासून घाणीच्या विळख्यात सापडला होता या मुळे या ठिकाणी पाणी जमा होऊन घान दुर्गंधी सुटली होती जेणे करून परिसरातील नागरिकांना विविध आजारांचा आणि साथ रोगांचा धोका निर्माण झाला होता जेणे करून जाफर इनामदार यांनी सातत्याने या साठी नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांच्या कडे पाठपुरावा सुरू ठेवला होता ज्याचे फलित आज प्रत्यक्ष लेंडी नाल्याची सफाई चे काम सुरू झाले आहे. या



नाल्यामुळे परिसरात दुर्गंधी, पाणी साचणे आणि डासांचा त्रास यामुळे नागरिक त्रस्त होते. अनेक वेळा तक्रारी करूनही दुर्लक्ष केले जात होते.एका ही नेत्याने अनेक दिवसापासून या प्रश्नाकडे लक्ष दिले नव्हते मात्र आता श्रेय लाटण्या साठी निवडणुका डोळ्या समोर ठेवून नेते मंडळी नाला सफाई चे ही श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. मात्र, जाफर इनामदार यांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करून या समस्येकडे लक्ष वेधले. याची जाणीव परिसरातील » पान २ वर

## उद्या ओरस येथे बाळशास्त्री जांभेकर अभिवादन सभा

सरकार नेटवर्क

वडवणी - अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आणि सिंधुदुर्ग जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने शुक्रवार दिनांक १७ मे २०२५ रोजी बाळशास्त्रीं जांभेकर अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.. एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या कार्यक्रमास सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.. कार्यक़्रमास सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर आणि सिंधुदुर्ग जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश तोरसकर यांनी केले आहे..

१७ मे रोजी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची १७९ वी पुण्यतिथी आहे.. सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघाच्यावतीने दरवर्षी अभिवादन सभा होत असते यावर्षी अ. भा. मराठी पत्रकार परिषद देखील या कार्यक्रमात सहभागी होत असून राज्यभरातून परिषदेचे शंभरावर पदाधिकारी बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यासाठी सिंधुदुर्ग नगरीत येत आहेत.. सिंधुदुर्ग ही बाळशास्त्री जांभेकर यांची » पान २ वर

## आष्टीच्या जुळ्या बहिणींना दहावीत मिळाले समान गुण



सरकार नेटवर्क

आष्टी : आष्टी शहरातील जुळ्या बहिणींनी दहावीच्या परीक्षेत अगदी 'जुळवून घेतल्यासारखे' यश मिळवले आहे. दोघींनीही समान गुण, म्हणजेच ९६ टक्के गुण मिळवले असून, त्यामुळे त्यांची चर्चा संपूर्ण परिसरात रंगली आहे. धीरज देशपांडे यांच्या या जुळ्या मुली दत्त मंदिर परिसरात राहतात. अनुष्का आणि तनुष्का असे जुळ्या बहिणींचे नाव. यंदा त्यांचं दहावीचं वर्ष होतं. दहावीत दोघांनाही ९६ टक्के मिळाले. अभ्यासाव्यतिरिक्त » पान २ वर

C M Y K

# बळवंतराव कदम माध्यमिक विद्यालयात गुणवंतांचा सत्कार सोहळा संपन्न

सरकार नेटवर्क

येळंबघाट - येथील बळवंतराव कदम माध्यमिक विद्यालय मध्ये दि .१४ मे २०२५ रोजी स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव चे औचित्य साधून नुकत्याच जाहीर झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ग्रामीण भागातून बालाघाटावर सर्वोत्कृष्ट होण्याचा बहुमान मिळविलेल्या प्रशालेतील गुणवंतांचा त्यांच्या पालकासमवेत सत्कार करण्यात आला.. श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळाचे आदरणीय सचिव श्री दिनकर रावजी कदम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री खाकरे बी के यांची कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तर श्री शिवाजी विद्यालय बीड चे उप मुख्याध्यापक श्री राजकुमार कदम यांची



प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.याप्रसंगी प्रशालेचे यशवंत व गुणवंत.विद्यार्थी कु. चोबे नंदिनी कु.डोईफोडे प्रतीक्षा चि.कदम संकेत कु.खंदारे प्रेरणा कु.चोबे संध्या चि. पटाईत कार्तिकेय कु.ढाकणे प्रगती चि.खारके अनिरुद्ध कु. काळकुटे मयुरी चि.वंजारे प्रज्वल कु. कांबळे अमृता कु. खंदारे स्वाती कु.क्षीरसागर प्रगती चि.कांबळे सज्जन व कु.भोसले प्रतीक्षा यांचा एसएससी परीक्षेतील या यशाबद्दल त्यांचे पालक श्री .अनिरुद्ध खारके ,श्री भारत पटाईत श्री नवनाथ चोबे श्री डोईफोडे विठ्ठल,श्री बाळासाहेब कांबळे,श्री परमेश्वर कांबळे, श्री कदम संदीप सौ.विद्या कांबळे, श्री खंदारे बाळू, श्री चोबे शहादेव,श्री श्री ढाकणे पंकज,श्री वंजारे कृष्णा,श्री खंदारे तुकाराम,श्री क्षीरसागर महादेव श्री. काळकुटे दिलीप, श्री भोसले बाळू सौ. भोसले यासोबत शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या सर्व गुणवंतांचा २ जुलै रोजी होणाऱ्या सोहळ्यात रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात येणार आहे. सत्काराला उत्तर देताना कू. चोबे नंदिनी हिने तर पालक प्रतिनिधी म्हणून श्री बाळकृष्ण खारके सर व श्री भारत पटाईत सर यांनी प्रशालेचे कौतुक करत आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री चौरे व्ही एस यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. सोंडगे बी बी यांनी केले.कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक श्री खाकरे बी के,उप मु अ.श्री मातकर बी डी , पर्यवेक्षक श्री चौरे व्ही एस यासह सर्व प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

## रुग्णांना फळ वाटप कार्यक्रम



सरकार नेटवर्क

केज विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते तथा युवकाचे हृदय स्थान अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसा निमित्त कार्यक्रम भारतीय जनता पार्टीच्या वतीने वृद्धत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, लोखंडी सावरगाव येथे, फळ वाटप कार्यक्रम पार पडला यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष गोकुळ नाना कदम, शहराध्यक्ष जय भाऊ गंभीरे, शंकर अण्णा उबाळे, हिंदूलाल आबा काकडे,दिलीपराव देशमुख,निलेश शिंदे, बाबासाहेब शेलके,सुभाष गुंडरे, मनोज देशमुख,भीमराव केंद्र,अनिल केंद्रे,राजाभाऊ नेहरकर,अभय केंद्र,आर डी नायक,अप्पा कदम,धनराज केंद्रे,श्रीकांत पतंगे,बळीराम चोपने,अनंत आरसुडे,सत्यप्रेम इंगळे, मंदार काटे, बाळासाहेब मामडगे,वैजनाथ देशमुख,प्रशान भैया आदनाक,सोमवंशी मेजर, गायकवाड नाना,सुनिल आडसूळ, व्यंकट किर्दंत,अकुश शिंदे,शिरिष मुकडे,पंडित जोगदंड,संतोष गडदे यांच्या शह तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते....

## तांदळेश्वर विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल शंभर टक्के

सरकार नेटवर्क

बीड - नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेचा निकाल दरवर्षीप्रमाणे या वर्षीही शंभर टक्के लागला आहे. नवगण शिक्षण संस्थेचे सहसचिव युवा नेते डॉ योगेश भैय्या क्षीरसागर व डॉ सारिका ताई क्षीरसागर यांनी सर्व विद्यार्थी व पालकांचे विशेष अभिनंदन केले आहे . त्याचबरोबर नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष आदरणीय प्राचार्य दीपाताई क्षीरसागर मॅडम यांनीही प्रथम द्वितीय तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांबरोबर सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व समाधान व्यक्त केले संस्था प्रशासकीय अधिकारी देशमाने सर व गुट्टे सर यांनीही सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या मुख्याध्यापक डाके सर यांनीही सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले सन २०२४,२५ या वर्षी या निकालामध्ये प्रथम क्रमांक विद्यार्थिनी भागडे रोहिणी रामहरी ९४.४०% गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळवला आहे. कळेकर कार्तिक अशोक या विद्यार्थ्यांनी ९३.६०% गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला आहे त्याचबरोबर तृतीय क्रमांक कु वाघमारे नेहा सखाराम या विद्यार्थिनीने ९३% घेऊन तृतीय क्रमांक मिळवला आहे कू खोसे अमृता महादेव या विद्यार्थिनीने ९२ टक्के मिळवलेले आहेत. टेकडे मयुरी या विद्यार्थिनीने ९२ टक्के गुण घेतले आहेत, उखानडे गणेश वाघमारे संदीप या विद्यार्थ्यांस ९२टक्के ,जगताप अंकिता प्रभाकर ९२टक्के गुण मिळवलेले असून या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे . एकूण बोर्ड परीक्षेसाठी ४२ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ४० विद्यार्थी विशेष प्रावीण्य व दोन विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे. तांदळवाडी , अंधापुरी व पंचक्रोशीतून या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे मनःपूर्वक शुभेच्छा तांदळवाडी शाळेचे मुख्याध्यापक श्याम डाके सर व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक शिक्षकेतर सर्व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्याम विद्यालय दहावीच्या निकालात गगन भरारी शंभर टक्के निकाल

सरकार नेटवर्क

येळंब घाट - केज तालुक्यातील दहिफळ वडमाऊली येथील श्याम विद्यालयाने दहावीच्या निकालात ही बारावी प्रमाणे बाजी मारली आहे याविषयी सविस्तर माहिती अशी की या विद्यालयाची स्थापना शिक्षण महर्षी शामराव जी गदळे दादा यांनी केली तेव्हापासून ते आज पर्यंत हे विद्यालय प्रसिद्धीच्या आणि प्रगतीच्या आलेखात कायम आहे संस्थेचे सचिव माननीय शरद गदळे यांनी आखून दिलेली वार्षिक शैक्षणिक चाकोरी आणि त्या चाकोरी प्रमाणे केलेले अध्यापन विद्यार्थ्यांची मेहनत कष्ट याचे फळ म्हणजे आज हाती आलेला दहावीचा निकाल या निकालात कुमारी तांदळे संध्या बाळू हिने ९६% गुण घेऊन प्रथम येण्याचा मान पटकावला आहे कुमारी मोरे वर्षा बंडू कुमार नागरगोजे प्रथमेश भागवत कुमार सानप सुरज बालासाहेब हे तिन्ही विद्यार्थी ९५.४०% गुण घेऊन द्वितीय आले आहेत कुमारी माने कोमल नवनाथ व कुमार ठोंबरे सुमंत सोमीनाथ ९५ टक्के गुण घेऊन हे दोन्हीही तृतीय आले आहेत तसेच कुमारी घुले सुरेखा अच्युत ९४. ६०% गुण घेऊन चतुर्थ येण्याचा मान मिळवला आहे या त्यांच्या यशाबद्दल व सर्व दहावीच्या गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव इंजिनीयर शरद गदळे , अध्यक्ष डॉक्टर शशिकांत दहिफळकर, कोषाध्यक्ष डॉक्टर शालिनी ताई कराड, कार्यक्षम प्राचार्या सौ जयश्री शरद गदळे, उप प्राचार्य राजेश गंधगे, ज्येष्ठ शिक्षक ठोंबरे बीबी भोसले पीएस श्रीमती कुलकर्णी मॅडम श्याम विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि परिसरातील सर्व पालक यांनी अभिनंदन केले आहे व विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत अशी माहिती श्री तात्यासाहेब डोईफोडे यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली आहे.

## नागनाथ विद्यालयाची दहावीच्या निकालाची उज्वल परंपरा कायम

सरकार नेटवर्क

बीड : तालुक्यातील मोरगांव येथील नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल ९४.८७% इतका लागला असून यावर्षी पण उज्वल निकालाची परंपरा या शाळेने कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक







विद्यालयाचे ११७ पैकी १११ विद्यार्थी उत्तीर्ण होवून विशेष प्राविण्यात ८२, प्रथम श्रेणीत २४, द्वितीय श्रेणीत ०२ तर तृतीय श्रेणीत ०३ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शाळेचा शेकडा निकाल ९४.८७% एवढा लागला यात गुणानुक्रमे प्रथम कु.टाकळे तेजस्वी संतोष ९६.६०%, द्वितीय कु.भड काजल केशव ९६.२०%, तृतीय चि.दुधाळ अभिषेक दत्तात्रय ९५.६०% गुण मिळवून उत्तीर्ण झाले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, कार्यालयीन अधिक्षक प्रकाश राठोड, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डी.बी. माटे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



सरकार नेटवर्क

**बीड : अमोल धोंगडे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना अशोक टल्ले, शिवाजी पाटोळे, दत्ता शिंदे, सुभाष सोनवणे आदि.**

## पान १ आणि ४ वरुन...

पान १ आणि ४ वरुन...

### बीड, नांदेड, औरंगाबादमध्ये ...

'सीट्रीपल आयटी' मुळे मराठवाड्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, 'एआय' वापरासह तांत्रिक कौशल्यविकासाची संधी मिळेल. युवकांना उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात 'सीट्रीपलआयटी' महत्वाची भूमिका बजावणार आहेत. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविलेल्या पत्रात, नांदेड आणि औरंगाबाद जिल्ह्यासाठी प्रत्येकी १९१ कोटी रुपये खर्चुन नवीन 'सीट्रिपलआयटी' स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे कळविले आहे. यापैकी १६२ कोटी ६२ लाख रुपये टाटा टेक्नॉलॉजी तर, उर्वरीत रक्कम राज्य शासन आणि संबंधित जिल्हा प्रशासन देणार आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून मराठवाड्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीट्रिपलआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी प्रत्येकी ७ हजार प्रमाणे मराठवाड्यातील २१ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे.

### राजवर्धन पंडितचे ...

घेऊन यश संपादन केलेला राजवर्धन पंडित हा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा नातू आणि युवा नेते रोहित पंडित व माजी नगरसेविका स्वरूपाताई पंडित यांचा मुलगा आहे. या यशाबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, गिरिकाभाभी पंडित, माजी जि प सभापती युधाजित पंडित, सौ अनुरूपाताई पंडित, युवानेते रोहित पंडित, सौ स्वरूपाताई पंडित, यशराज पंडित यांच्यासह प्राचार्य व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### उद्या ओरस येथे ...

जन्मभूमी आहे.. पोंभुर्ले येथे बाळशास्त्रींचा जन्म झाला.. ओरस येथे बाळशास्त्री जांभेकर यांचे नुकतेच भव्य स्मारक उभारण्यात आले आहे.. या स्मारकातच अभिवादन सभा सकाळी १० वाजता होणार आहे..जिल्हा आणि राज्यातील पत्रकारांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन दोन्ही संस्थांच्यावतीने करण्यात आलं आहे.. परिषदेची त्रैमासिक बैठक अभिवादन सभेनंतर दुपारी १.३० वाजता अ. भा. मराठी पत्रकार परिषदेची त्रैमासिक बैठक सभागृहातच होत आहे.. पत्रकारांसमोरील विविध समस्यांची चर्चा करून ठोस निर्णय बैठकीत घेतले जाणार आहेत.. परिषदेचे वरिष्ठ अधिकारी उपाध्यक्ष, विभागीय सचिव, परिषद प्रतिनिधी, कार्यकारिणी सदस्य, अधिस्विकृती समितीवरील परिषदेचे प्रतिनिधी, जिल्हा अध्यक्ष तसेच डिजिटल मिडिया परिषद, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती आणि महिला आघाडीचे वरिष्ठ पदाधिकारी बैठकीस निमंत्रित आहेत.. दर तीन महिन्यांनी परिषदेची ही बैठक राज्याच्या विविध भागात होते.. मागील बैठक नांदेड येथे पार पडली होती...यावेळची बैठक सिंधुदुर्ग येथे होत असून सिंधुदुर्ग जिल्हा पत्रकार संघाने बैठकीची सर्व व्यवस्था आणि नियोजन केले आहे..

### आष्टीच्या जुळ्या बहिणींना...

जुळ्या बहिणींना नृत्याची आवड आहे. अभ्यासात सातत्य आणि शाळेच्या उपक्रमांत सहभाग असल्याने त्या शाळेतील गुणी विद्यार्थिनी म्हणून ओळखल्या जात होत्या. विशेष म्हणजे, त्या दोघी सतत एकत्र अभ्यास करायच्या, एकमेकींच्या शंकांचे निरसन करायच्या आणि शाळेच्याही सर्व प्रवासात सोबत असायच्या. निकाल जाहीर झाल्यावर त्यांचा आनंद गगनात मावेना. 'एकसारखे गुण मिळतील असं वाटलं नव्हतं, पण खूप आनंद झालाय असं अनुष्काने सांगितलं.

### समुपदेशनाने बदल्यांचा निर्णय...

घेऊन मी काम करत आहे. माझ्यावर प्रेम करणारे असंख्य लोकं आहेत, त्यांच्यासाठी तुम्ही काम करता, त्यामुळे हा निर्णय घेतला. सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला महत्वाचा वाटतो. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी आपल्या परिवारापासून दूर असणारे, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना यामुळे हवी ती पोस्टींग मिळणार आहे. हव्या त्या ठिकाणी बदल्या झाल्याने तुमच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद समाधान देणारा आहे, असं श्रीमती मुंडे यावेळी म्हणाल्या.

### जाफर इनामदार यांच्या...

नागरिकांना आहे निवडणुका आहेत म्हणून आम्ही जन सेवेत नाहीत बारा महिने चोवीस तास आम्ही लोकांची सेवा करतो आणि करत राहणार असे देखील जाफर इनामदार म्हणाले. शेवटी प्रशासनाने नाल्याची स्वच्छता करून नागरिकांना दिलासा दिला आहे. स्थानिक नागरिकांनी इनामदार यांचे आभार मानले असून, असे जनतेसाठी कार्य करणारे लोकप्रतिनिधी असेच हवे अशी भावना व्यक्त केली जात आहे असे पत्रकाद्वारे जाफर इनामदार यांनी कळवले आहे.

### धारूर येथे सोयाबीन...

व तुर पीक उत्पादन वाढ याविषयी सविस्तर माहिती झाली. शेतकऱ्यांनी या तंत्राचा व्यवस्थितपणे उपयोग करावा असे सांगितले. कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी केले. याप्रसंगी विचारमंचावर श्री. तुकाराम चोपडे जिल्हाध्यक्ष भारतीय किसान संघ, श्री. शशिकांत गव्हाणे सावड मराठवाडा समन्वयक भारतीय किसान संघाचे, श्री. अनिल जोशी संचालक लोकोपकार शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड धारूर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. सुदर्शन दळवी यांनी मानले.

### तलवार बाळगल्याच्या...

समोरील बाजूस पितळी पत्रा आहे सदरील म्यान काढुन पाहताच तिचे पात्याची लांबी २७ इंच आहे अशी असलेली जुनी वापरतील तलवार मिळून आली त्या नुसार पोलिसांनी आरोपी तानाजी उर्फ आकाश वरवट याला पोलीस स्टेशन पेठ बीड येथे घेऊन जाऊन त्याचे विरोधात गु.र.नं १७३/२०२० नुसार गुन्हा दाखल केला. त्यास कलम ४/३५ शस्त्र अधिनियम दाखल केले व त्यानंतर


### शरद खाडे ज्ञानेश्वरी...

मंत्री पंकजा मुंडे या विवाह सोहळ्यात उपस्थित राहणार होते. मात्र काही कामानिमित्त त्यांना येता आलं नाही. त्यामुळे मंत्री पंकजा मुंडे यांनी वधू-वरास शुभाशीर्वाद शुभेच्छा संदेश द्वारे पाठवला. यावेळी विवाह सोहळ्यास माजी आमदार केशव दादा आंधळे, राजाभाऊ अण्णा मुंडे , बन्सी भाऊ मुंडेसह मंत्रालयातील व बीड जिल्ह्यातील प्रतिष्ठित उपस्थित होते.

# बीडच्या डीपीडीसी निधीवर अजितदादा इफेक्ट

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ५७५ कोटी रुपयांच्या विकास निधीचे नियोजन होणार

बीड : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि त्यानंतर बीड जिल्ह्यात झालेल्या राजकीय घडमोडीने वातावरण ढवळून निघाले आहे. धनंजय मुंडे यांनी मंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला, जिल्हा नियोजन समितीच्या निधीमध्ये भ्रष्टाचाराचा आरोप, मुंडे यांचा विश्वासू सहकारी वाल्मीक कराड याचा देशमुख खून प्रकरणातील हात या सगळयाचा परिणाम जिल्ह्यातील राजकारणावर झाला. आता मात्र अजित पवार यांनी जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारत डीपीसीमधील ९१ कोटीची निधीत वाढ करत त्यांनी बीडकरांना विकास कामांचा विश्वास दिला आहे. वाढती गुन्हेगारी, राजकीय हस्तक्षेप, दरोडे, खून आणि ढासळत असलेली कायदा व सुव्यवस्था यामुळे बीड जिल्ह्याची राज्यभरात बदनामी झाली. अशा पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वतःकडे घेतले. एक आव्हान म्हणून त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली. दोन बैठका घेत त्यांनी संपूर्ण जिल्ह्याचा आढावा, विकास कामे, त्यासाठीचा निधी, रखडलेले प्रकल्प याची माहिती घेतली आणि आता जिल्हानियोजन समितीचा निधी ९१ कोटींनी वाढवून दिला. एकूण ५७५ कोटींचे नियोजन डीपीसीत करण्यात आले आहे. येत्या सोमवारी दि.१९ रोजी अजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा नियोजन समितीची बैठक होणार आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रीपद अजित पवार यांच्याकडे गेल्याचा थेट फायदा बीडला होताना दिसतो आहे. जिल्हा विकास आराखड्यासाठीचा निधी वाढवण्यात आला असून यात ९१ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ५७५ कोटी रुपयांच्या विकास निधीचे नियोजन होणार आहे. जिल्ह्याचा मागच्या वर्षीचा विकास आराखडा ४८४ कोटी रुपयांचा होता. यंदा त्यात ९१ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण व हत्येमुळे जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा समोर आला. तसेच जिल्ह्यातील वाळू माफियागीरी, राख माफियागीरी, प्रशासनातील अधिकाऱ्यांची ठराविक नेत्यांसोबतच्या मिलीभगतमुळे विकासाचा वाढलेला अनुशेष या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याचे पालकमंत्रीपद घेतले. त्यानंतर सर्वप्रथम त्यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीत वाढ केली.



## जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालय गांजपूरचा दहावीचा निकाल शंभर टक्के

किल्ले धारूर : धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या गांजपूर येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून या विद्यालयाची विद्यार्थिनी कु. मधुरा हनुमंत मुंडे हिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. नुकताच आज इयत्ता दहावी शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या निकालामध्ये गांजपूर जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून सेमी इंग्लिश माध्यमातून कु मधुरा हनुमंत मुंडे हीने ९७.६०% गुण मिळून प्रथम क्रमांक मिळवला आहे द्वितीय क्रमांक कुमारी वैष्णवी अशोक रणदिवे - ९५.६० % या विद्यार्थिनीने मिळवला आहे. तृतीय क्रमांक कुमारी मुक्ता एकनाथ घोडके - ९४.४०% घेऊन मिळवला आहे. कु.जाधव माधुरी अशोक - ९४.४०%, कु. आकांक्षा दादाराव हंडीबाग - ९३.६० %. कु. चाटे वैष्णवी पंढरी - ९३.४०%,, कु. साक्षी श्रीकृष्ण गिराम - ९३.००%, ,चि. तिडके सिद्धार्ध संदीपान - ९१.६०%, जाधव शर्वरी राजेश - ९१.२०%, माने प्रियांका धनेश्वर व - ९०.८०%, कु.आराधना संतोष सुदामे - ९०.६०%, पाथरकर अक्षरा नितीन - ८९.६०% इत्यादी विद्यार्थी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत यशस्वी झालेले आहेत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे ईश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव ईश्वर मुंडे, प्राचार्य विजयकुमार मुंडे ,उपमुख्याध्याप अरुण समुद्रे, सहशिक्षक महादेव केदार, नाथा ढगे, मंगल वटाणे ,इयत्ता दहावीच्या वर्ग शिक्षिका भारती सोनवणे, हनुमंत काळे ,प्रमोद कोमटवार, लिपिक पोपट कदम, नितीन सुतार ,युवराज जाधव इत्यादींनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## चंदनसावरगाव येथे इयत्ता दहावी बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न



केज : मौजे चंदन सावरगाव येथे सकल मराठा सेवक मनोज दादा तरंगे पाटील यांचे कट्टर समर्थक डिंगाबर श्रीहरी तपसे यांच्यावतीने इयत्ता दहावी तसेच बारावी परीक्षेमध्ये मध्ये प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंदन सावरगाव चे सरपंच जालिंदर दळवी तर प्रमुख अतिथी म्हणून छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी दादा ठोंबरे , पैठण केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ. रामकिशन मुळे, उमरी शाळेचे मुख्याध्यापक राजेभाऊ झंाळे,चंदन सावरगावचे उपसरपंच बालासाहेब तपसे, उद्योजक राजेभाऊ तपसे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष शंकर तपसे, तसेच लालबहादूर शास्त्री विद्यालय चंदनसावरगाव येथील श्री खुळे सर व सपाटे सर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री खुळे सरांनी केले. तर इयत्ता अकरावीची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने कशाप्रकारे पार पडणार आहे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन पैठण केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ. रामकिशन मुळे यांनी केले. याप्रसंगी बारावी व दहावी परीक्षेतील खालील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## मयुरी कळकुटे चे दहावी बोर्ड परीक्षेत यश

बीड : येळंब घाट येथील बळवंत माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थ्यांनी कु. मयुरी दिलीप काळकुटे ने महा. राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी बोर्ड परीक्षा घेतलेल्या होत्या. याचा निकाल दि. १३मे रोजी जाहीर करण्यात आला. इयत्ता दहावी परीक्षेत मयुरी दिलीप काळकुटे ने ९२ टक्के मार्क मिळवून घवघवीत यश संपादन केलेआहे. दहावी म्हणजे परीश्रमाची शिस्तीची आणि स्वप्नाची पहीली पायरी आहे. तिच्या घरच्याचे एकच स्वप्न



होते की त्यांची मुलगी प्रमाणिक पणे शिकावी व प्रगती करावी तिच्या घरच्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिने अहोरात्र मेहनत करून जिद्द चिकाटी अभ्यासात सातत्य ठेऊन हे यश संपादन केले. या यशाबद्दल मयुरीचे शाळेचे मुख्याध्यापक ,शिक्षक ,पालक व गावकरी याच्याकडून अभिनंदन केले जात आहे व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## के.एस.पी विद्यालयची १०० टक्के निकालाची यशस्वी परंपरा कायम

बीड : के.एस.पी विद्यालयचा दर वर्षा प्रमाणे याही वर्षी निकाल १०० टक्के लागला. प्रथम क्रमांक कु. सानप प्रिती परमेश्वर ९५.०० टक्के, व्दितीय क्रमांक कु. अंकुशे तेजस्वी अरुण ९४.२ टक्के, तृतीय क्रमांक कु. मस्के अदिती सुभाष ९३.६ टक्के, कु. येवले संदीप भारत ९३.६ टक्के तसेच कु. मस्के सुमीत भगवान ९३.४ टक्के, कु. आगे वैष्णवी जगदीश ९२.६ टक्के, कु. राख अमृता सयाजी ९२.४ टक्के, कु. घोलप अर्जुन रामनाथ ९२.०० टक्के, कु. काशील सर्वज्ञ तुकाराम ९२.०० टक्के, कु. गोरे शारदा साहेबराव ९१.६ टक्के, कु. पिसाळ ऋतुजा प्रताप ९१.२ टक्के, कु लोहार अर्जुन गणेश ९१.०० टक्के, कु. नागरगोजे ऋषिकेश आसाराम ९०.८ टक्के कु. वनवे मानसी हनुमंत ९०.६ टक्के, कु. काशीद चैतन्य तुकाराम ९०.४, कु. दहिफळे अनुजा अरुण- ९० टक्के अशा प्रकारे १६ विद्यार्थीनी ९० टक्केचे वरती गुण प्राप्त केले आहेत. ४० विद्यार्थ्यांनी ८० टक्केच्या वरती गुण प्राप्त करुन यश संपादन केले आहे. शाळेतील या मुलांचे १० वी तील सर्व विषय शिकवणाऱ्या शिक्षकांनी योग्य ते मार्गदर्शन करुन खुप परिश्रम घेतले होते. विद्यार्थ्यांचा आज शाळेमध्ये सत्कार समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमास सर्व गुणवंत विद्यार्थी व पालकांना आमंत्रित केले होत. या कार्यक्रमास सौ.अंजलीताई शेळके , प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुखतसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी व पालक उपस्थितीत होते. सर्व मुलांचे कौतुक करुन सत्कार करण्यात आला व कार्यक्रम संपन्न झाला.



## बाळनाथ विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

बीड : बीड तालुक्यातील बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेचा या वर्षीचा १० वी चा निकाल हा शंभर टक्के लागला आहे. श्री उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बाळनाथ विद्यालय चाकरवाडी तालुका जिल्हा बीड १० वी फेब्रुवारी/मार्च २०२५ चा निकाल शंभर टक्के लागला आहे ४१ पैकी ४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे २४ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत २ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान विद्यार्थीनीने मिळवला आहे. कु. जगताप दीक्षा भाऊसाहेब



९४.२०% घेऊन प्रथम क्रमांक मिळवला हे. तसेच द्वितीय क्रमांक डोईफोडे मानसी चंद्रकांत ९३.६०% या विद्यार्थिनीने मिळवला आहे. तृतीय क्रमांक जगताप स्वरूपा अतुल ९३.२०% यांनी मिळवला आहे. तसेच विद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी, तृतीय श्रेणी मध्ये आपला क्रमांक मिळवला असून विद्यालयाचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे तसेच कवडे काजल केशव ९२.८०, जांभळे वैभव सुरेश ९१.८०, अनवणे राजनंदिनी राजेंद्र ९०.८०, पोटरी अंजली श्रीराम ९०.००, डोईफोडे कन्हैया शशिकांत ८८.४०, दाइगडे ओमराजे ज्ञानेश्वर ८७.८०, भोसले सायली हरिदास ८७.२०, सावंत राज रोहिदास. ८५, कानडे स्नेहा बळीराम ८४.००, जगताप अक्षय राजेंद्र ८३,जांभळे वैभव अप्पाराव ८२, चाळक रोहित राजेंद्र ८१ टक्के घेत सर्व उत्तीर्ण झाले आहेत सर्व गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री उत्तरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती डॉ. ज्योती मेटे मॅडम तसेच संस्थेचे सचिव आशुतोष भैय्या मेटे संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री फाटक सर, चाकरवाडी गावचे आदर्श सरपंच कवडे सर तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य मुख्याध्यापक जगताप टी. आर. वर्गशिक्षक श्री कदम सर. परीक्षा विभाग प्रमुख श्री नखाते सर सर्व शिक्षक कर्मचारी ग्रामस्थ व सर्व पंचक्रोशीतील पालक यांनी अभिनंदन केले आहे व विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## अक्षय मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

बीड - युवकाचे हृदय स्थान अक्षय भैय्या मुंदडा यांच्या वाढदिवसा निमित्त अक्षय निवास रिंग रोड,अंबाजोगाई येथे वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व अक्षयभैय्या मित्र मंडळ यांच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. या रक्तदान शिबिरामध्ये ७५ रक्त दात्यांनी रक्तदान केले यामध्ये युवा वर्ग व महिला यांनी रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी होण्यासाठी वसुंधरा सेवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी व स्वामी रामानंद तीर्थ येथील रक्तपेढीतील कर्मचारी यांनी सहकार्य केले.




## आदर्श माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

बीड - सरस्वती महिला शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित आदर्श माध्यमिक विद्यालय या शाळेतील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून यंदाही निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून, या परीक्षेमध्ये शाळेचा शेकडा निकाल ९७% एवढा लागलेला आहे. परीक्षेत १५९ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. कु. गवते भक्ती गोकुळ ९६.२०% गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक मिळवला आहे. चि. डावकर औदुंबर भैय्यासाहेब ९६.००% गुणांसह द्वितीय क्रमांक चि. माने सार्थक भैरवनाथ



९५.४०% कु. पावले स्वाती नवनाथ ९५.४० गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे. विशेष प्रावीण्य श्रेणी- १०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले प्रथम श्रेणी- ३६ द्वितीय श्रेणी -१६ सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा. श्री अशोक अण्णा जाधव ,सौ. सविता ताई जाधव, प्राचार्य औटी मॅडम ,मुख्याध्यापक डोके मॅडम , श्री गणेश जाधव सर , श्री सुधाकर बापू मंचुके , श्री सचिन जाधव सर ,, शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## अंबाजोगाईत बसमध्ये थुंकल्याच्या कारणावरुन विद्यार्थ्यासह त्याच्या मित्राला मारहाण

अंबाजोगाई : बीड वरून एसटी प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्याचे अपहरण करून अमानुष मारहाण करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना अंबाजोगाई शहरात घडली असून चार आरोपी विरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तीन आरोपींना पोलिसांनी सीसीटीव्ही च्या मदतीने ताब्यात घेतले तर अन्य एक जण फरार आहे. बीडवरुन अंबाजोगाईला जाणाऱ्या बसमध्ये थुंकल्याच्या



कारणावरुन एका महिलेशी वाद झाला. यानंतर ही बस अंबाजोगाई शहरात पोहचताच चारजणांनी बसमध्ये घुसत विद्यार्थ्यासह त्याच्या मित्राला मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी वाहक व चालकाने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचे न ऐकता या चौघांनी या दोघांना खाली उतरवत मारहाण सुरुच ठेवली. या मारहाणीत संदेश सावंत हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर एसआरटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात ऋषी शिंदे, लखन जगदाळे, निकेश जगदाळे, बालाजी जगदाळे या चौघांविरोधात कलम १०९,१०४(१),११५(२),३५२, ३५१(२),३५१(३),३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायं. दैनिक
माझी सरकार
Daily Evening Majhi Sarkar
शुक्रवार दि. १६ मे, २०२५




सरकार नेटवर्क

आष्टी येथील गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक, पत्रकार जावेद पठाण यांची मुलगी आलिशा पठाण हिने एसएससी परीक्षेमध्ये ९४ टक्के गुण मिळवून नेत्रदीपक यश संपादन केल्याबद्दल सत्कार करताना सुप्रसिद्ध कवी प्रा. सय्यद अल्लाउद्दीन, जावेद पठाण व प्रा. निसार शेख दिसत आहे.

# वीस कोटीतच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण

## वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवारांच्या राजीनाम्याची मागणी : डॉ.गणेश ढवळे

सरकार नेटवर्क



बीड : अवकाळी पाऊस ,कधी कोरडा तर कधी ओल्या दुष्काळामुळे नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा, मालाला हमीभाव नसणं या प्रमुख कारणांमुळे शेतकरी मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १५ दिवसांच्या आत मदत मिळणे बंधनकारक असताना महिनोंमहिने शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने मिळत नाही. वारंवार निवेदने आणि आंदोलने केल्यानंतर सरकारला जाग येते आणि सरकार तुटपुंज्या निधीची तरतूद करते. दि.१५ मे रोजी संपुर्ण राज्यासाठी केवळ २० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असुन या निधीतून प्रलंबित सर्व शेतकऱ्यांच्या वारसांना मदत मिळणे शक्यच नाही.परीणामी शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी आणखी प्रतिक्षा करावी लागणार आहे. केवळ २० कोटीतच शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण केल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्यांनी दिली वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार हे सोमवार रोजी बीड जिल्हा दौऱ्यावर असुन जिल्हा नियोजन समितीची बैठक प्रशासनातील विविध बाबींचा आढावा घेण्यासाठी येणार असुन शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात येणार असल्याचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस, शिवशर्मा शेलार,शेख मुबीन, पांडुरंग हराळे आणि बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, उपाध्यक्ष इंटक संदिप झिंजुर्के यांनी तहसीलदार ( महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय बीड अविनाश शिंगटे यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड यांना दिले आहे.

### ६ विभागांसाठी केवळ २० कोटी...!

राज्यातील कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर या सहा विभागांसाठी केवळ २० कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. विभागीय आयुक्त. वितरीत निधी कोकण १२ लाख पुणे १ कोटी ६ लाख नाशिक. ३ कोटी ३९ लाख छत्रपती संभाजीनगर ४ कोटी. ९२ लाख अमरावती. ६ कोटी ७६ लाख नागपूर ३ कोटी ७५ लाख एकुण २० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. मराठवाड्यात १ जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ या ३ महिन्यात २६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. यात बीड जिल्हा ७१ ,लातुर १८, धाराशिव ३१, छत्रपती संभाजीनगर ५०, जालना १३, परभणी ३३, हिंगोली ३७ अशा एकुण २६९ शेतकरी आत्महत्यांची नोंद आहे. बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२५ ते ३१ एप्रिल २०२५ या ४ महिन्यात ९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यातील ५५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. दरम्यान छत्रपती संभाजीनगर विभागासाठी केवळ ४.९२ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे.या विभागात बीडसह ८ जिल्हे येतात.यातुन कोणत्या जिल्ह्याच्या वाट्याला किती येतात?? यातुन सर्व शेतकरी कुटुंबियांना मदत मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांसाठी बार्टीच्या विशेष योजनेची तातडीने अंमलबजावणी करावी : नितीन सोनवणे

सरकार नेटवर्क



बीड : ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र राज्य प्रवक्ते तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे गुणवंत विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत जाहीर करण्यात आलेल्या विशेष योजनेची त्वरित अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. ही योजना २०२१ साली जाहीर झाली होती, परंतु महाराष्ट्र शासनाने अद्याप ती कार्यान्वित केलेली नाही. सोनवणे यांनी सांगितले की, बार्टीच्या या विशेष योजनेमुळे अनुसूचित जातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोठा आधार मिळेल. मात्र, ही योजना बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि व्यावसायिक भवितव्य धोक्यात आहे. ही योजना तातडीने सुरू करून सामाजिक न्यायाच्या दिशेने ठोस पाऊल उचलावे, अशी मागणी त्यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे केली आहे. ऑल इंडिया पँथर सेना या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनावर दबाव आणण्यासाठी पुढील काळात आंदोलनात्मक पावले उचलण्याचा विचार करत आहे. याबाबत सोनवणे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या हितासाठी आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही. शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अन्यथा राज्य भर ऑल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र राज्य रस्त्यावर उतरेल याची शासनाने दखल घ्यावी.

# 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर भारतीय सेनेच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा यात्रा

सरकार नेटवर्क

मुंबई– भारतीय सेनेने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे दाखविलेल्या शौर्य, संयम आणि बलिदानाच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली. या यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी देशसेवा केलेल्या सैन्यदलातील सेवानिवृत्त अधिकारी आणि जवानांची लक्षणीय उपस्थिती होती. ऑगस्ट क्रांती मैदान ते गिरगाव चौपाटीपर्यंत काढलेल्या या तिरंगा यात्रेला मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ऑगस्ट क्रांती मैदानातील स्तंभाला अभिवादन करुन तिरंगा यात्रेला सुरुवात झाली आणि गिरगाव चौपाटी येथील हुतात्मा तुकाराम ओंबाळे यांच्या पुतळ्याला पुष्पचक्र अर्पण करत अभिवादन करुन या यात्रेचा समारोप झाला. या तिरंगा यात्रेत भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री आशिषजी शेलार, मंगलप्रभात लोढा तसेच भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शरद खाडे ज्ञानेश्वरी तोंडे यांचा शुभविवाह सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत



सरकार नेटवर्क

वडवणी – महाराष्ट्रामध्ये सध्या लग्न सराई चालू आहे, मंत्रालयात महसूल विभागात लिपिक असणारे श्री शरद खाडे व धारुर तालुक्यातील सोनीमोहा गावची कन्या ज्ञानेश्वरी यांचा विवाह मोठ्या थाटामाटात. गोगलवाडी फाटा येथे असणाऱ्या मंगल कार्यालयात, पार पडलं यावेळी शेकडो नागरिक त्यांना शुभाशीर्वाद देण्यासाठी . मंगल कार्यालयात रात्री सात वाजता आले होते. आणि खूप उत्साहात विवाह सोहळा संपन्न झाला. » पान २ वर

# संजय आंधळे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या तिरंगा यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

सरकार नेटवर्क



वडवणी : ऑपरेशन शेंदूरच्या ऐतिहासिक यशानंतर राष्ट्रभक्ती , अभियानाच्या अंतर्गत वडवणी तालुका इथे निघालेल्या तिरंगा रॅलीला, उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आज सकाळी नऊ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक , येथे तिरंगा रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीने देशभक्ती प्रेमाने ऊर्जा आणि नागरिकांचा सहभाग , यामुळे संपूर्ण परिसर भारावून निघाला. वडवणी तालुक्यातील अनेक तरुणांनी या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी संजय भाऊ आंधळे यांनी देश गौरव व नरेंद्र मोदी यांची स्तुती करण्यात आली. नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान आहेत याचा सार्थ अभिमान आहे असे देखील यावेळी संजय भाऊ आंधळे यांनी म्हटलं. यावेळी उपस्थित वडवणी नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, भाजपाचे तालुका अध्यक्ष रेडे, युवा नेते महादेव सावंत, युवा नेते धनराज मुंडे, यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# धारूर येथे सोयाबीन व तुर उत्पादन वाढ विषयक शेतकरी कार्यशाळा संपन्न

सरकार नेटवर्क



किल्ले धारूर : दि. १५ मे रोजी राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये सेवा विस्तार समिती, तालुका कृषी कार्यालय. धारुर, लोकोपकार शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड, ग्रामीण विकास प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोयाबीन व तूर उत्पादन वाढ या विषयावरील शेतकरी कार्यशाळेची सुरुवात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. कार्यशाळेमध्ये निवृत्त प्रमुख शास्त्रज्ञ कडधान्य संशोधन प्रकल्प महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथील डॉ. बाळकृष्ण जमादाग्री प्रमुख मार्गदर्शक म्हणून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सोयाबीन व तूर पिकाच्या उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांनी कोणकोणत्या प्रकारची खते, औषधे, बी–बियाणे वापरावीत यांची शेतकरी बांधवांना सविस्तर माहिती दिली. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे निवृत्त कुलसचिव डॉ. बी. पी. पाटील यांनी शेतकऱ्यांना कमी खर्चातून अधिकाधिक नफा कसा मिळविता येईल याचे तंत्र सांगितले. कार्यशाळेच्या अध्यक्षीय समारोपातून धारूरचे तालुका कृषी अधिकारी श्री. जे. बी. भगत यांनी या कार्यशाळेच्या माध्यमातून धारूर परिसरातील शेतकऱ्यांना या कार्यशाळेच्या माध्यमातून सोयाबीन » पान २ वर

# तलवार बाळगल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता -ॲड.सचिन काळे

सरकार नेटवर्क



बीड – तलवार बाळगल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता थोडक्यात माहिती अशी की दिनांक ३०/०६/ २०२० रोजी दुपारी एक वाजता सुमारास पोलीस कर्मचारी पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की इसम नामे आकाश उर्फ तानाजी शिवाजी वरवट राहणार रामतीर्थ नाका पेठ बीड हा लोकांना धाक दाखवन्याच्या उद्देशाने रामतीर्थ नाक येथे तलवार बाळगून दहशत निर्माण करत आहे. त्याच्या कडे तलवार असून तो रामतीर्थ नाका परिसरात फिरत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावर सदर पोलिसांनी वरिष्ठअधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पंचांना घेऊन बातमीचा उदेश समजावून सांगुन रामतीर्थ नाका बीड येथे सुमारे दीड वाजता छापा मारला असता रामतीर्थ येथील चौकात तानाजी उर्फ आकाश वरवट हा रामतीर्थ नाक चौक येथे तलवार बाळगून दहशत निर्माण करत होता त्यास पकडून ताब्यात घेतले व दोन पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एका तलवार मिळून आली. लालसर रंगाची लाकडी पुठ्ठ्याची तिची लांबी २८ इंच असून म्याना च्या » पान २ वर

# प्रगतीसाठी सर्व शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे : शिवाजीराव खोगरे

सरकार नेटवर्क



अंबाजोगाई : शेतकऱ्यांनी उत्पादन व उत्पन्नवाढीलसाठी सेंद्रीय शेतीकडे सक्षम पर्याय म्हणून बघावे. सेंद्रीय शेती हीच कृषि क्षेत्राला संजीवक ठरणार आहे. असे मत जयप्रभा ग्रामीण विकास मंडळाचे सचिव शिवाजीराव खोगरे यांनी व्यक्त केले. डॉ. पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती गटातील सभासदांसाठी कृषि विभाग जय प्रभा ग्रामीण विकास मंडळाच्या पुढाकारातून बुधवार (१४ मे) रोजी केज तालुक्यातील वरपगाव येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती व कृषि विभागाच्या विविध योजनांबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मार्गदश्न करताना खोगरे बोलत होते. या बैठकीसाठी प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती गटाचे अध्यक्ष डॉ. टि.एल. देशमुख, जयप्रभा ग्रामीण विकास मंडळाचे सचिव शिवाजीराव खोगरे, आत्माचे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. वरपगाव (ता. केज, जि. बीड) येथील डॉ. पंजाबराव देशमुख सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती मिशनच्या सेंद्रिय शेती गटातील शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानातून सप्त धान्यची स्लरी, दशपर्णी अर्क, डिकंपोजर, जिवाणू किटकनाशक, जिवाणू बुरशीनाशक, जिवाणू आदी सेंद्रिय घटक शेतकऱ्यांनी स्वतः तयार करून शेतात वापरण्यासाठी मिळणाऱ्या अनुदानातून बॅलर खरेदी करायचे ठरले. या प्रसंगी पोखराचे प्रमुख राऊत यांनी कृषी विभागाच्या विविध योजना सांगितल्या.

हे पत्र मालक मुद्रांक, प्रकाशक, संपादक शेख फारुक शेख हमीद यांनी आर एम प्रिंटर्स, बार्शी रोड बीड -४३११२२ येथे छापून सा. माझी सरकार कार्यालय घर क्र. ३-३-१७६, आशोक नगर ढगे कॉलनी बीड, ता. जि. बीड (महाराष्ट्र) - ४३११२२ येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी : ९४२३३०९३०२. majhisarkar2023@gmail.com (या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, सर्व वाद बीड न्यायालय अंतर्गत)

Daily Evening Majhi Sarkar News paper Owenr, Printer Publisher, Editor Shaikh Farooq Shaikh Hamid Has printed At R.m Offset Barshi Road, Beed. Dist. Beed (Maharashtra 431122) and Published At Daily Majhi Sarkar, Hous No, 3-3-176, Ashok Nagar, Dhage Colony Beed. tq.Dist.Beed Maharashtra 431122 Mob- 9423309302, Epaper : majhisarkar.com, Email : majhisarkar2023@gmail.com